# महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीमधील आण्णासाहेब लठ्ठे यांचे योगदान

**श्री. तेजस दिलीप कुदळे,** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली, tejaskudale.3@gmail.com

---

**प्रस्तावना-**

आण्णासाहेब लठ्ठे यांनी त्यांच्या जीवन प्रवासात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक अशा अनेक क्षेत्रात बहुमूल्य अशी कामगिरी केली. त्यांच्या राजकीय जीवनात विविध विषयांवर त्यांनी स्वतःची भूमिका घेऊन ती प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राजकीय विचारात ब्राह्मणेतर चळवळ ही मध्यवर्ती होती. तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्यावेळचे ब्राह्मणेतर समाजाचे मागासलेपण यामधून आण्णासाहेबांच्या राजकीय विचारांची जडणघडण झालेली होती. त्यांच्या या विचारधारेला सक्रीय रूप देण्यासाठी त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीमध्ये मोलाचे योगदान दिले. आण्णासाहेबांच्या जीवनप्रवासात त्यांची ब्राह्मणेतर चळवळीबद्दलची तळमळ, कालसुसंगत बदललेली भूमिका व त्यासाठी त्यांनी दिलेले योगदान हे अत्यंत मोलाचे आहे.

**बीजशब्द**- आण्णासाहेब लठ्ठे, सत्यशोधक समाज, डेक्कन रयत सभा, ब्राह्मणेतर पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

**विषय विवेचन-**

या शोधनिबंधात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सामाजिक परिस्थितीचे आण्णासाहेब लठ्ठे यांच्या राजकीय विचारांमध्ये पडलेले प्रतिबिंब त्याचबरोबर आण्णासाहेब लठ्ठे यांचे ब्राह्मणेतर चळवळीतील योगदान याचा अभ्यास करणार आहे.

संशोधन पद्धती- या शोधनिबंधासाठी संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, श्राव्य व्याख्यानमाला या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे.

**उद्दिष्ट-**

स्व. आण्णासाहेब लठ्ठे यांच्या महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीमधील योगदानाचा अभ्यास करणे

**गृहीतक-**

आण्णासाहेब लठ्ठे यांचे राजकीय विचार आणि ब्राह्मणेतर चळवळीमधील योगदान हे तत्कालीन सामाजिक वास्तवाचा( ब्राह्मणेतर समाजाचे मागासलेपण) परिणाम होते.

**स्व. आण्णासाहेब लठ्ठे यांचा जीवन परिचय-**

९ डिसेंबर १८७८ ला कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे आण्णासाहेब लठ्ठे यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कुरुंदवाड येथे झाले तर माध्यमिक शिक्षण मिरज हायस्कूल व सांगली हायस्कूल येथे झाले. उच्च शिक्षण घेण्यासाठी १८९६ यावर्षी अण्णासाहेबांना राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, त्याच बरोबर पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. १९०३ यावर्षी एम. ए. तर १९१६ यावर्षी एल. एल. बी. चे शिक्षण पूर्ण केले. छत्रपती शाहू महाराजांनी आण्णासाहेब लठ्ठे यांना बोलावून घेऊन कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये १९०७ यावर्षी प्रोफेसर म्हणून नेमले. आण्णासाहेब इंग्रजी हा विषय फारच उत्तम रीतीने शिकवीत असत. ते प्रोफेसर असताना छत्रपती शाहू महाराज त्यांना वरचेवर बोलावून घेत व बहुजन समाजाच्या शिक्षणाकरिता आपणास काय करता येईल याबद्दल विचारविनिमय करीत असत. कॉलेजमधील अनुभवाचा आणि ज्ञानाचा त्यांना पुढील जीवनात खूप फायदा झाला.

**विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील भारतातील परिस्थिती-**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व अनेक नेते भारताला 'स्वराज्य' मिळावे अशी मागणी करीत होते. लोकमान्य टिळक हे महाराष्ट्रातील जहाल नेते यासाठी आग्रही होते. त्याच वेळी समाजात असाही एक वर्ग होता की जो स्वातंत्र्याच्या आधी सामाजिक सुधारणा कराव्यात यासाठी आग्रही होता. महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर हे या सामाजिक सुधारणांसाठी आग्रही होते, त्यामुळे राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा यामध्ये कोणत्या गोष्टीला अग्रक्रम द्यायचा याबाबत तत्कालीन नेत्यांमध्ये मतभेद होते. आण्णासाहेब लठ्ठे यांनाही राजकीय स्वातंत्र्याच्या आधी सामाजिक सुधारणा व्हाव्यात असेच वाटत होते.

**आण्णासाहेब लठ्ठे आणि सत्यशोधक समाज-**

ब्राह्मणांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक प्रभुत्वाविरुद्ध महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान त्याच बरोबर शाहू महाराजांचे शिक्षणाद्वारे ब्राह्मणवाद नष्ट करण्याची कल्पना आण्णासाहेब लठ्ठे यांना भावली. आण्णासाहेब लठ्ठे, महादेव डोंगरे आणि भास्करराव जाधव या तीन शिक्षित ब्राह्मणेत्तर नेत्यांनी शाहू महाराजांची ही कल्पना वास्तवात उतरविण्यासाठी कार्य केले. १९११ साली पुणे येथे या तिघांनी पहिली राज्यव्यापी सत्यशोधक परिषद आयोजित केली. कोल्हापूर संस्थानात आण्णासाहेब १९०७ ते १९१४ पर्यंत नोकरी करत होते, याबरोबर सामाजिक कार्यातही भाग घेत होते. १९११ साली कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रेरणेने सत्यशोधक समाजाची त्यांनी स्थापना केली. १९११ ते १९१९ या काळात भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे व महादेव डोंगरे यांनी या चळवळीची धुरा आपल्या अंगावर घेतली. कोल्हापूर सत्यशोधक समाजाचे कार्य फक्त कोल्हापुरातच नव्हे तर सातारा आणि पुण्यातही मोठ्या प्रमाणात होते. १९१५ साली आण्णासाहेबांचे वास्तव्य बेळगावी झाले तेथे त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीचे रोपटे लावले. १९१५ साली अहमदनगर येथे भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या पाचव्या अधिवेशनाचे आण्णासाहेब अध्यक्ष होते त्यावेळी अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले "आपण ब्राह्मणविरोधी आहोत असा लोकांचा गैरसमज आहे पण आपण ब्राह्मणविरोधी नसून ब्राह्मणवादाविरोधात आहोत हे जगाला समजायला हवे." या अधिवेशनात ब्राह्मणेतर समाजात शिक्षण प्रसार वेगाने व्हावा यासाठी दोन ठराव पारित करण्यात आले.

**डेक्कन रयत सभेची स्थापना-**

१९१६ साली निपाणी येथे भरलेल्या अधिवेशनात असे ठरविण्यात आले की 'सत्यशोधक समाज' ही जी धार्मिक आणि सामाजिक चळवळ आहे ती राजकीय संघटनेत परिवर्तीत करावी, त्यानुसार 'डेक्कन रयत सभेची' स्थापना करण्यात आली. १९१६ सालच्या लखनऊ काँग्रेस अधिवेशनात मवाळ आणि जहाल तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यात समझोता झाला आणि ते एकत्र आले, त्यामुळे 'स्वराज' च्या मागणीला बळ मिळाले. लोकमान्य टिळकांना राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळाली त्यावेळी ब्राह्मणेत्तर पक्षाला काँग्रेसमध्ये घेण्याचे अनेक प्रयत्न झाले पण आण्णासाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काँग्रेसपासून दूर राहणेच पसंत केले. २९/०८/१९१६ च्या प्रगती जीनविजय च्या अंकात आण्णासाहेब लिहितात "सामाजिक गुलामगिरीत अडकलेल्या असंख्य लोकांच्या मुक्ततेसाठी ब्राह्मणेतर लोकांची राजकीय संघटना असणे गरजेचे आहे, त्यासाठी 'डेक्कन रयत सभेची' स्थापना केली आहे, जीचे उद्दिष्ट दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक प्रगती करणे आहे. डेक्कन रयत सभेने, मराठा लीगसमवेत ब्राह्मणेत्तर जातींसाठी विभक्त मतदारसंघ आणि आरक्षित जागांसाठी मागणी केली. १९११ पासून कोल्हापूर हे सत्यशोधक चळवळीचे केंद्र होते पण जेव्हा ही चळवळ राजकीय चळवळीत परिवर्तीत झाली तेव्हा पुण्याचे जेधे हे मराठा नेते पुढे आले व ब्राह्मणेतर राजकीय चळवळीचे पुणे हे केंद्र बनले.

**आण्णासाहेब लठ्ठे आणि असहकार चळवळ-**

१९२० च्या सुमारास महात्मा गांधींनी असहकार चळवळ सुरू केली, तेव्हा आण्णासाहेबांनी या चळवळीला व शाळा आणि महाविद्यालयांवरील बहिष्काराला विरोध केला. त्यांच्या मते ब्राह्मणेतर समाज नुकताच शिक्षण घेऊ लागला होता, अशावेळी त्यांनी शिक्षणावर बहिष्कार टाकला तर हा समाज नेहमीच अंधःकारात राहील आणि कॉंग्रेस पक्षाला हेच हवे आहे असेही त्यांना वाटत होते. याच वर्षी मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीत ब्राह्मणेतर जागेसाठी बेळगाव मधून 'डेक्कन ब्राह्मणेतर लीग' तर्फे आण्णासाहेब निवडणुकीला उभे राहिले या निवडणुकीच्या प्रचारासाठी शाहू महाराजांनी आण्णासाहेबांना आर्थिक मदत केली, आण्णासाहेबांचा या निवडणुकीत विजय झाला.

**आण्णासाहेब लठ्ठे यांचे मध्यवर्ती कायदेमंडळातील कार्य-**

मध्यवर्ती कायदेमंडळाचे सदस्य म्हणून कार्य करताना आण्णासाहेबांनी सभागृहात अनेक प्रश्न उपस्थित केले, विविध विधेयकामध्ये सुधारणा सुचवल्या तसेच विविध विषयांवर त्यांनी स्वतः विधेयके मांडली. यावेळी त्यांनी पुढील मुद्द्यांवर विशेष भर दिला.

१) हिंदू धर्मातील फार मोठा वर्ग हा शैक्षणिकदृष्ट्या मागास आहे याची जाणीव आण्णासाहेबांना होती त्यामुळे त्यांनी या वर्गाच्या शिक्षणावरती भर दिला.

२) त्याकाळी जोशी लोक हे ग्रामस्थांकडून दरवर्षी जबरदस्तीने दक्षिणा वसूल करीत असत अन्यथा धार्मिक कार्य प्रसंगी त्यांची अडवणूक करीत असत, हिंदूंबरोबरच जैन धर्मियांकडूनही दक्षिणा वसूल करीत असत त्यांना सरकारी जमिनी वतन म्हणून दिल्या होत्या, अशावेळी आण्णासाहेबांनी कायदेमंडळात 'जोशी वतन नष्ट करणारे विधेयक' मांडले व पारित करून घेतले, त्यामुळे हे विधेयक पारित झाल्यानंतर त्यांचे वतने नष्ट झाली व त्यांच्या जमिनी खालसा झाल्या.

३) शूद्रांच्या अनौरस संततीस औरस संततीप्रमाणे कायदेशीर वारसा प्राप्त करून देण्यासंबंधी विधेयक पारित करून घेतले.

**ब्राह्मणेतर पक्षामधील फूट-**

१९२३ मध्ये मुंबई इलाख्याच्या कौन्सिलच्या निवडणुकांमध्ये मराठा आणि मराठेतर समाजामध्ये दरी निर्माण झाली, मोठ्या प्रमाणात जातीय प्रचार केला गेला आणि परिणामी आण्णासाहेब लठ्ठेंचा बेळगावच्या भुजंगराव दळवी यांच्याकडून पराभव झाला. त्यानंतर ब्राह्मणेत्तर पक्षाचे अध्यक्षपदही दळवींकडे गेले. मराठा आणि मराठेतर वादामुळे आण्णासाहेबांचे ब्राह्मणेतर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांबरोबरचे संबंध खराब झाले याचवेळी शाहू महाराजांनी आण्णासाहेबांना कोल्हापूरचे दिवाणपद सांभाळण्याची विनंती केली आणि १९२५ मध्ये आण्णासाहेब कोल्हापूरला दिवाण म्हणून रूजू झाले.

**अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेस-**

१९२४ साली आण्णासाहेबांनी 'अखिल भारतीय ब्राह्मणेत्तर काँग्रेसचे' पहिले अधिवेशन बेळगाव येथे भरवले, याचवेळी बेळगावात महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे' अधिवेशन भरले होते, जणू काही काँग्रेसच्या अधिवेशनाला ब्राह्मणेत्तर काँग्रेसचे अधिवेशन ही तोडच होती. सुरुवातीच्या काळात 'अखिल भारतीय ब्राह्मणेत्तर कॉंग्रेस' संघटित असली तरी नंतरच्या काळात मात्र हा ब्राह्मणेतर पक्ष जातीजातीमध्ये विभागला गेला, या पक्षाचे जे नेते ब्राह्मण आणि काँग्रेसच्या विरोधात विधिमंडळात निवडून गेले ते आपापसातच भांडू लागले, त्यामुळे हा पक्ष तुकड्यांमध्ये विभागू लागला.

**आण्णासाहेब लठ्ठेंचा काँग्रेस पक्षातील प्रवेश-**

१९३० नंतर 'अखिल भारतीय ब्राह्मणेतर काँग्रेसचा' प्रभाव कमी होऊ लागला आणि याच वेळी 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा' प्रभाव वाढू लागला, त्यामुळे कॉंग्रेस हाच एकमेव पर्याय म्हणून समोर आला आणि अनेक ब्राह्मणेतर नेते काँग्रेसकडे आकर्षित झाले. ब्राह्मणेतर पक्षाकडून निराशा झाल्यामुळे व काँग्रेस हा एकी आणि शिस्त असलेला एकमेव पक्ष असल्याची जाणीव झाल्यामुळे आण्णासाहेबांनीदेखील १ ऑगस्ट १९३६ या दिवशी ब्राह्मणेतर पक्षातील ५०० लोकांसमवेत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. महात्मा गांधींनी 'राजकीय स्वातंत्र्य' आणि 'सामाजिक सुधारणा' या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले त्यामुळे यामधील अग्रक्रमाचा मुद्दा दूर झाला. १९३७ नंतर ब्राह्मणेतर पक्ष संपुष्टात आला व संपूर्ण देश गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यचळवळीत सामील झाला.

**समारोप-**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला समाजामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती, समाजातील मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित होता, सामाजिक दृष्ट्या मागासलेला होता, या मागासलेपणासाठी ब्राह्मण समाजाचे प्रभुत्व कारणीभूत आहे अशी खात्री आण्णासाहेबांना वाटत होती त्यामुळे त्यांनी आपले जीवन ब्राह्मणेतर चळवळीसाठी वाहिले. त्यांच्या मते सामाजिक सुधारणा होण्याआधीच स्वातंत्र्य मिळाले तर ते स्वातंत्र्य समाजातील प्रभुत्वशाली वर्गालाच अनुभवता येईल व अनेक शतकांपासून मागास राहिलेला समाजातील मोठा वर्ग हा प्रभुत्वशाली वर्गाचा दास बनून राहील त्यामुळे त्यांनी राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिला. ब्राह्मणेतर चळवळीमधील त्यांचे योगदान त्यापुढील पिढ्यांसाठीही प्रेरणादायी ठरले.

**संदर्भ-**

1. Patil Padmaja, (1986), 'Annasaheb Latthe and his times' unpublished thesis in Department of History, Shivaji University, Kolhapur.
2. मद्दाण्णा य. दा., (1979), 'स्व. आण्णासाहेब लठ्ठे - जीवन व कार्य', प्रकाशक- बिरनाळे वसंत देवाप्पा, अध्यक्ष, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, कार्यकारी समिती.
3. धर्माधिकारी अविनाश, 'आधुनिक भारताचा इतिहास' श्राव्य व्याख्यानमाला.